ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत.(श्रीम.संगिता बापुराव गोसावी सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत घुमरी पंचायत समिती कर्जत )

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र. ३०३५२०१
दिनांक - ११ / ०४/२०२५

संदर्भ :- १. या कार्यालयाचे आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/४९०६७७/२०२४दि.-२५ /०७/२०२४ (सेवा निलंबन आदेश)

२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन ई.क्रमांक ४९६९४१ दिनांक २९/०७/२०२४

३. या कार्यालयाचे आदेश ई.क्र. ६६०७५५ दि.०४/११/२०२४ ( चौकशी अधिकारी यांचे नियुक्ती आदेश)

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१)

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (५)

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१११११/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक- १४/१०/२०११

७. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र. विप्रआ-१११२/प्र.क्रं.८२/११-अ, दि.२० एप्रिल २०१३

८. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निप्रआ११८/प्र.क्र.११/११अ, दिनांक- ०९/०७/२०१९

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्रीम.संगिता बापुराव गोसावी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत घुमरी पंचायत समिती कर्जत यांना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर करण्याचे गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.०२ ज्ञापनान्वये श्रीम.संगिता बापुराव गोसावी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत घुमरी पंचायत समिती अहिल्यानगर यांचे विरुध्द गैरवर्तनाचे एकूण ०९ दोषाआरोप ठेवून शिस्तभंगाची कार्यवाही करणे कामी विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ०७ चे शासन निर्णयानुसार श्रीम.संगिता बापुराव गोसावी , सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला असल्याने,तसेच त्यांचे गैरवर्तनाचे दोषारोपांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असल्याने. त्यांचे सेवा निंलबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आलेला असुन प्रकरणी श्रीम. संगिता बापुराव गोसावी यांचे सेवानिलंबन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे श्रीम.संगिता बापुराव गोसावी सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत घुमरी पंचायत समिती कर्जत

यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती ---------------- ग्रा.पं. डोंगरगाव ता.जामखेड
येथे पुन:स्थापित करीत आहे.

सदरची पुन:स्थापना ही विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस अधिन राहून करणेत येत आहे. श्रीम.संगिता बापुराव गोसावी सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती कर्जत यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, सदयस्थितीत सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

या आदेशाची नोंद श्रीम.संगिता बापुराव गोसावी सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी समिती कर्जत यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202508990E0068 असा आहे.

11/4/25

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.संगिता बापुराव गोसावी सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती कर्जत
सेवा निलबन मुख्यालय पंचायत समिती पारनेर

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ---------- जामखेड

२/- श्रीम.संगिता बापुराव गोसावी सेवा निलबीत ग्रामपंचायत अधिकारी हे झालेनंतर हजर अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.